कोकण विकास पॅकेज कार्यक्रमांतर्गत सागरी
जिल्हयातील बंदरे व खाडीतील गाळ
काढणेबाबत कृती आराखडा व प्रशासकीय
मान्यता इत्यादी.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-मत्स्यवि-१००४/प्र.क्र.११५/पदुम-१४**
**मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२.**
**दिनांकः-१८ मे,२००५.**

वाचा:- १) शासन निर्णय,नियोजन विभाग,क्रमांक,कोविका-१००४/प्र.क्र.३५/का.१४५६, दिनांक २८.२.२००४
२) शासन निर्णय,नियोजन विभाग,क्रमांक,अंदाज-१००४/प्र.क्र.१६८/२००४/अर्थसंकल्प ३,दिनांक २५.६.२००४.
३) शासन निर्णय,क्रमांक, कृषी व पदुम विभाग,क्रमांकः बीजीटी-२००४ /अर्थसंकल्प-३,दिनांक ३.७.२००४
४) शासन निर्णय क्रमांक मत्स्यवि-१००४/प्र.क्र.११५/पदुम-१४,दिनांक २९.७.२००४
५) शासन निर्णय मत्स्यवि-१००४/प्र.क्र.११५/पदुम-१४,दिनांक १२ जानेवारी,२००५.

**प्रस्तावना**:-

कोकण विभागातील सिंधुदुर्ग,रत्नागिरी,रायगड,ठाणे व मुंबई या पाच जिल्हयातील मच्छिमारांकडून बंदरे व खाडीमध्ये साचणारा गाळ काढण्याची मागणी वारंवार करण्यात येत होती.मत्स्य बंदरे/खाडीत गाळ साचल्यामुळे मच्छिमारांना त्यांच्या बोटी जेट्टी/बंदरे येथे आणण्यास अडचणी येत होत्या. त्यामुळे बोटीतून मासळी उतरवितांना अडचणी निर्माण होवून मत्स्यव्यवसायावर परिणाम होत होता. निधीच्या अभावामुळे साचलेला गाळ काढण्याचे काम पूर्ण करता येत नव्हते. तसेच मत्स्यबंदरे व जेट्टीचे बांधकाम केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून देखिल कार्यान्वित करता आलेली नाहीत. सबब, मत्स्यव्यवसायावर होत असलेले विपरित परिणाम व याबाबत मच्छिमारांची होत असलेली मागणी विचारात घेवून कोकण विभागातील उपरोक्त पाच जिल्यामधील बंदरे व खाडीतील साचलेला गाळ काढण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तदनुषंगाने संदर्भ क्रमांक-५ प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले होते.हे

आदेश आता सुधारित करण्यात येत असून खालीलप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय</u>**:-

कोकण विभागातील उपरोक्त पाच जिल्हयातील मच्छिमारांच्या वरीलप्रमाणे अडचणी लक्षात घेऊन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आलेली कामे ठेव अंशदानामधून (Deposit contribution) कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरहू कामे किनारी अभियंता,मुंबई यांच्या अखत्यारित पत्तन अभियंता यांचेकडून सा.बां.नियमावलीतील तरतुदीनुसार कार्यान्वित केली जातील.

कार्यकारी अभियंता,आयुक्त,मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई हे किनारी अभियंता,मुंबई व पत्तन अभियंता यांचेशी समन्वय साधतील तसेच गाळ काढण्याच्या कामाची अंमलबजावणी अथवा कार्यान्वयन योग्य तऱ्हेने होत आहे याची गरज वाटेल तेव्हा शहानिशा व तपासणी करण्यास त्यांना प्राधिकृत करण्यात येत आहे, तसेच अशा कामाचे अंतीम देयक अदा करण्यापुर्वी किनारी अभियंता,मुंबई यांनी आयुक्त मत्स्यव्यवसाय यांची पूर्व परवानगी घेऊन त्यानंतर अंतीम देयक अदा करावे.

उपरोक्त गाळ काढण्याच्या कामाची गुणवत्ता राखली जात आहे अथवा नाही हे पाहण्यासाठी महाराष्ट्र शासन,सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असलेल्या दक्षता व गुण नियंत्रण मंडळ,कोकण भवन,नवी मुंबई यांचे नियंत्रण असेल.

आयुक्त मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी सादर केलेल्या कोकण विकास पॅकेज कार्यक्रमांतर्गत बंदरे/खाडीतील गाळ काढण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे व त्यांना सदर योजनेकरिता निर्देशित करण्यात येत आहे. या योजना कार्यान्वित करणे व सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावलीतील तरतूदीनुसार या कामाकरिता किनारी अभियंता/पत्तन अभियंता यांनी मागविलेल्या निविदा उघडणे,छाननी करणे व निविदा अंतिम करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | आयुक्त मत्स्यव्यवसाय | अध्यक्ष |
| २. | किनारी अभियंता,मुंबई | सदस्य |
| ३. | सागरी अभियंता,महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई | सदस्य |
| ४. | उपसंचालक (सागरी) मुख्य कार्यालय,मुंबइ | सदस्य |
| ५. | प्रादेशिक मत्स्यव्यवसाय उपसंचालक,कोकण विभाग,मुंबई | सदस्य |

आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य,मुंबई हे या योजना राबविण्यासाठी नियंत्रक व पर्यवेक्षकीय अधिकारी असतील व या योजनांवर त्याचे प्रशासकीय आर्थिक नियंत्रण असेल.शासनाच्या निविदा वा योजनांची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने होत आहे याची खात्री करण्यासाठी ते पाहणीसुध्द करु शकतील.

आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी खालीलप्रमाणे बंदरे/खाडीतील गाळ काढण्याच्या सादर केलेला प्रस्ताव तसेच खाली नमूद केलेल्या सर्व कामांना उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेत प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून ती कामे विहित कालावधीत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | जिल्हा | खाडया/बंदराचे नाव | प्रस्तावित निधी (रु.लाखात) |
|---|---|---|---|
| १. | सिंधुदुर्ग | १. देवगड | ७५.०० |
| | | २. वेंगुर्ला | ४०.०० |
| | | ३. सर्जेकोट | ४५.०० |
| | | ४. निवती कोचरा | २५.०० |
| | | ५. मोरवे | २५.०० |
| | | ६. खवणे | २५.०० |
| | | ७. आचरा | २५.०० |
| | | एकूण (१) | २६०.०० |
| २. | रत्नागिरी | ८. मिरकरवाडा | १२५.०० |
| | | ९. तुळसुंदे | ४०.०० |
| | | १०. राजिवडे | ३०.०० |
| | | ११. दाभोळखाडी | ४०.०० |
| | | १२. साखरीनाटे | ६०.०० |
| | | १३. चिंचबदर ते वाघबीळ | २५.०० |
| | | एकूण (२) | ३२०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | रायगड | १४. थेंरोडा | २०.०० |
| | | १५.थळ | ३०.०० |
| | | १६. दिघोडा | ३०.०० |
| | | एकूण (३) | ८०.०० |
| ४. | मुंबई | १७. वेसावा | ३७.०० |
| | | १८. तळपशा बंदर | २५.०० |
| | | १९. मनोरी खाडी | २५.०० |
| | | २०. गोराई | २५.०० |
| | | २१. मालवणी | २५.०० |
| | | २२. कफपरेड | २५.०० |
| | | एकूण (४) | १६२.०० |
| ५. | ठाणे | २३. सातपाटी-मुरबेखाडी | ३०.०० |
| | | २४. नवापूर-दांडीखाडी | ३०.०० |
| | | २५. केळवा | २५.०० |
| | | २६. डहाणू | ३०.०० |
| | | २७. दातिवारे | २५.०० |
| | | २८. अर्नाळा | २०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| | | एकूण (५) | १६०.०० |
| | | एकूण (१+२+३+४+५) | ९८२.०० |

उपरोक्त यादीप्रमाणे ५ जिल्हयातील बंदरे/खाडीतील गाळ काढणे या कामाची निश्चिती करण्यात येत आहे. त्याप्रमाणे गाळ काढण्याच्या कामासाठी लागणारी रक्कम कामाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त कामे अंशदान ठेव योजना (Deposit contribution) यामधून कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. किनारी अभियंता,मुंबई हे त्यांच्या अखत्यारीतील पत्तन अभियंता कडून गाळ काढण्याचे कामाचे सर्वेक्षण करुन सविस्तर अंदाजपत्रके तयार करतील व तदनुसार महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली प्रमाणे अंदाजपत्रकांना सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मान्यता देण्यास/प्राप्त करुन घेण्यास जबाबदार राहतील तसेच किनारी अभियंता/पत्तन अभियंता यांनी या योजनेतील कामांच्या निविदा,मागवून या निविदा उघडणे व छाननी करुन शासनास मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाहीसाठी उपरोक्त समितीकडे ते सादर करतील.

उपरोक्त कामापोटी होणारा खर्च हा खालील लेखाशिर्षातर्गत कोकण पॅकेज अंतर्गत मंजूर असलेल्या रु.९,८३,२०,०००/- (रु.नऊ कोटी त्र्यांऐंशी लाख वीस हजार फक्त) तरतुदीच्या मर्यादेत करण्यांत यावा.

लेखाशिर्ष मागणी क्रमांक डी-१०.
४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च
१०३ सागरी मत्स्यव्यवसाय
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना
(०२) लहान मासेमारी बंदरे (४४०५ ०६५१)
२० इतर खर्च

आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी या योजनेच्या अंमलबजावणीचा प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आत शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(किरण ठाकूर)
उपसचिव,महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,

प्रति,

सचिव (कोकण विकास तथा सांस्कृतिक कार्य विभाग)मंत्रालय,मुंबई-३२.

सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई
आयुक्त मत्स्यव्यवसाय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
विभागीय आयुक्त,कोकण विभाग,मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई
मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम,प्रादेशिक विभाग,मुंबई
किनारी अभियंता,नवीन प्रशासकीय इमारत,३ रा मजला,बांद्रा (पू),मुंबई
कार्यकारी अभियंता,आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय,बांद्रा (पूर्व),मुंबई
पत्तन अभियंता,मुंबई/ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
उपसंचालक (सागरी),आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालय,बांद्रा,मुंबई